## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

## प्रकरण ५ वे

## उपसंहार

मराठीतील ख्यातनाम कथालेखक व्यंकटेश माडगूळकर यांची "बनगरवाडी" ही कादंबरी ख-या अर्थाने मराठीतील पहिली प्रादेशिक कादंबरी आहे. आधीच्या प्रादेशिक कादंब-याहून या कादंबरीचे रूप वेगळे असल्याचे सकृद्दर्शनी जाणवते. माडगूळकरांच्या या कादंबरीत रूढ कथानक आढळून येत नाही. व्यक्तिचित्रणातही वेगळेपणा आढळतो. तसेच या कादंबरीत रूढ पध्दतीचा नायक दिसत नाही. निवेदनपध्दतीतही वेगळेपणा आहे या कादंबरीत हा जो वेगळेपणा आहे. तो कोणत्या स्वरूपाचा आहे ? त्याची वैशिष्टये, प्रादेशिकतेत कितपत आहेत.? हे पहाण्याच्या दृष्टीने प्रस्तुत लघुप्रबंधात विवेचन केलेले आहे.

पहिल्या प्रकरणात कादंबरीचे विशेष आणि प्रादेशिक कादंबरी यांचा विस्ताराने विचार केलेला आहे. तो करताना भालचंद्र नेमाडे यांची "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत अशी साहित्यकृती असते" ही कादंबरीची व्याख्या सूत्र म्हणून स्वीकारून मराठीच्या नागर व प्रादेशिक कादंब-यांची चर्चा केली आहे. प्रादेशिक कादंबरी अवतरण्याच्या आधी पांढरपेशा लेखकांना ना.सी. फडके कृत घालून दिलेल्या नियमाबरहुकूम लिहिलेली नागर कादंबरी होती. त्यामुळे जीवनाच्या वास्तवतेला स्पर्श न करताच ती कल्पनारम्य स्वरूपाची व मनोरंजन करण्याच्या हेतूने लिहिलेली असे तिचे स्वरूप होते. ही कादंबरी कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण भाषा-शैली या चार घटकावर आधारलेली दिसते. या चार घटकांचा साकल्याने विचार करता दिसते की, कल्पनेने तयार केलेले , योगायोगावर आधारलेले कथानक यांचा

ती आधार घेणारी होती.

नागर कादंबरीचा उगम आणि स्वरूप पाहिल्यावर त्याच प्रकरणात प्रादेशिक कादंबरीची वाटचाल पाहिली तेव्हा असे दिसते की, प्रादेशिक कादंबरीकार, र.वा. दिघे, श्री.ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, ग.ल. ठोकळ, यांनी "प्रदेश" या घटकाला महत्त्व आपल्या कादंबऱ्यातून दिलेले असले तरी नागर कादंबरीकाराप्रमाणे फडके प्रणीत तत्त्व सांभाळून प्रेम-मद्य-मैथुन यांच्याच प्रेमकथा प्रादेशिक कादंबरीतून लिहिल्या. मानवी जीवन व निसर्ग यांचा आंतरीक संबंध असतो हे प्रादेशिक कादंबरीकारांच्या फारसे ध्यानात आलेले दिसत नाही.

दुसऱ्या प्रकरणात "बनगरवाडी"ची आशयसूत्रे कोणती आणि "बनगरवाडी" त प्रादेशिक वैशिष्टये कोणती दिसतात हे पाहिले.

"बनगरवाडी" कादंबरीच्या कथानकाबाबत माडगूळकरांनी पारंपारिक, उत्कंठावर्धक ही जुनी कल्पना स्वीकारलेली नाही. तर ग्रामीण जीवनाचे वास्तवचित्रण करण्याच्या दृष्टीने व्यक्तिरेखा निर्माण करून घटना प्रसंगाचे चित्रण केले व प्रस्तुत कादंबरीचे कथानक घडविले असे आढळून येते. हे चित्रण करताना रंजकतेपेक्षा प्रादेशिक जीवनाचे वास्तवचित्रण कसे होईल याकडेच माडगूळकरांचा रोख आहे. कथानक रचलेच्या बाबतीतही माडगूळकरांनी एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. "बनगरवाडी" कथा सांगताना माडगूळकरांनी अनेक आशयसूत्रे वापरली आहेत.

१) पहिले सूत्र असे की, एका वाडीतील शिक्षकाचे जीवन चित्रित करणे. हे करण्यासाठी राजाराम विठ्ठल सौंदणीकर याची प्राथमिक शिक्षकाच्या

स्थात "बनगरवाडी"त पाठवण केली आहे. या शिक्षकाची दृष्टी शोधक आहे. तो मेंढपाळाच्या जीवनाशी लवकरच समरस होतो. उजाड माळावरील मेंढपाळाचे विश्व तो न्याहाळतो. तेव्हा त्याला जाणवते की, मेंढपाळांच्या दृष्टीने शाळेपेक्षा मेंढरे राखणे अधिक फायद्याचे वाटते तेव्हा मास्तर कारभा--याच्या साहयाने शाळा सुरु करतो. "बनगरवाडी"त ज्ञानाबरोबर बलाची उपासना म्हणून तालीम बांधतो व बनगरवाडीत चलनवलन निर्माण करतो. एवढेच नव्हे तर "बनगरवाडी"तील लोकांची हरत-हेची कामे - कुणाचे पैसे बदलून आण, कुणाला बैल बघून दे, कुणाचे पत्र लिहि, कुणाला चोळी शिवून आणून देणे, न्यायदानापासून तालीम बांधण्यापर्यंतची, कामे करतो. बनगरवाडीच्या जीवनाशी समरस होतो व बनगरवाडीत दुष्काळ पडण्यास व योगायोगाने बदलीची ऑर्डर मिळताच वाडी सोडून निघून जातो.

"बनगरवाडी"चे सामाजिक जीवन कसे आहे हे दुसरे सूत्र आहे. "बनगरवाडी" ही माणदेशाच्या उजाड माळावरील वाडी. पाऊस अपुरा त्यामुळे मेंढपाळाचा धंदा करणारे धनगर या वाडीत आहेत. शाळा शिकण्या पेक्षा मेंढरे राखणे अधिक फायद्याचे हे त्यांचे सूत्र बनले. मेंढरे आणि मेंढपाळ हे इतके एकमेकाशी समरस आहेत की, काकुबा मेंढरांची पिलं चटकन ओळखतो, राखणीला सावध राहून तो बसूनच झोप घ्यायला शिकतो. लांडग्याचा वास त्याला सहज ओळखता येऊ लागतो. मेंढरांची पैदास करणा-यांना हे मेंढके मोफत मेंढ्या देतात.

गावात सर्वजण एकमेकांशी सलोख्याने वागतात. मोठया लोकांना मान देतात. अंधश्रध्दा रूढी, परंपरा, जात-पातीची बंधने पाळतात. त्याच्या विरुध्द वागणा-यास शासन होते. वाळीतसुध्दा टाकले जाते.

सुगीला आनंदून मेंढपाळ नाचू-गाऊ लागतात. गजीनृत्य, लेझीम इ. खेळात देहभान विसरून जातात. 'मावल्या आईची' यात्रा मोठ्या थाटात करतात. नवस फेडणे, चुकीची माफी करणे या गोष्टी पार पाडल्या जातात. पुढल्या वर्षासाठी मावल्या आईचा आशीर्वाद मागितला जातो. मेंढपाळाच्या वागण्यात मात्र सच्चेपणा जाणवतो .

तिसऱ्या सूत्रात "बनगरवाडी"तील निसर्ग व मानवी जीवन यांचा संबंध पाहिला. मेंढपाळांचे विश्व हे निसर्गावलंबी आहे. निसर्ग फुलताच, बहरताच, मेंढपाळांचे विश्व आनंदून जाते व निसर्ग कोपताच मेंढपाळ वाडी सोडून पोट भरण्यास परमुलखात जातात.

"बनगरवाडी"त दोनच ऋतु दिसतात. एक उन्हाळा व हिंवाळयात सुगी सुरु होताच मेंढपाळ आनंदाने नाचू, गाऊ लागतात. तर पावसाळयात पाऊस पडला तर पेरणी साठी बैल नाही म्हणून थटून न बसता माणसे जनावरे होऊन औत ओढतात. नानीने आपली थटलेली पेरणी स्वत: बैल होऊन पार पाडली पण ती हातपाय गाळून बसली नाही. किंवा उन्हाळयात दुष्काळ पडताच गाव सोडण्यासही मेंढपाळ मागेपुढे पहात नाहीत. याचाच अर्थ निसर्गापुढे ही माणसे नमत नाहीत. कोमेजून जात नाहीत. तर संकटाशी सामना देत जगतात.ही जिद्द त्या निसर्गानेच त्यांच्या मनात निर्माण केलेली आहे.

सुगीच्या दिवसात धनगरांची-रामोशाची पोरे ठासणीच्या बंदुका घेऊन शिकार करीत फिरतात. अशावेळी मधाची पोवळी शोधून मध खातात. भरलेली पाखरे टिपून भाजून खातात. याच वेळी कोल्हाटी, बहुरुपी, दरवेशी, गारुडी येऊन खेळ करुन जातात. लोकांची करमणूक होते. पण ही करमणूक फुकट

करून घेत नाहीत. तर त्यांना शेर-पायली धान्य देतात.

दुष्काळात मेंढरे घेऊन जाणारा धनगर पुन्हा निसर्ग फुलताच परत येतो. तर काही जण भूमीवरील, गावावरील श्रध्देपोटी मरणाही पत्करायला तयार होतात. काकुबा त्याचे उत्तम उदाहरण होय. अशा या तीन सूत्रांचा विचार केल्यानंतर या कादंबरीत प्रादेशिकतेची कोणती वैशिष्टये दिसून येतात ते पाहिले.

ही "बनगरवाडी" उजाड माणदेशाच्या माळावर बसलेली, निसर्ग-सौंदर्याचा अभाव असलेली, यंत्र दूरतेमुळे नव्या युगाचा वारा न लागलेला धाब्याची घरे प्राण्याचे हेल, सर्वत्र शेळ्या-मेंढयाचा भरून राहिलेला उग्र दर्प. मेंढरे राखण्या-हून दुसरा धंदा माहित नाही. शाळेपेक्षा मेंढरे राखणे अधिक महत्त्वाचे ही ठाम समजूत झालेले मेंढपाळ आहेत.

अशा या "बनगरवाडी"त राजाराम विठ्ठल सौंदणीकर मास्तर येतो. इथल्या भावविश्वाशी समरस होतो. इथल्या मुलांसाठी ही शाळा सुरु करतो. ज्ञानाबरोबर बलाची उपासना करावी म्हणून तालीम बांधतो. त्याला मेंढपाळां-च्या जीवनात वावरत असताना असे दिसते की इथला प्रदेश व माणूस यांच्यात आंतरिक संबंध आहे ही माणसे संकटाशी सामना करतात. पण भीत मात्र नाहीत. एकमेकांना मदत करणे. मेंढरांची पैदास करणाऱ्याला मेंढरु फुकट देणे सुगी येताच गजी नृत्य व ढोल यांच्यात रात्रभर देहभान विसरणे. सत्प्रवृत्तीला व माणसांना मान देणे म्हणूनच कारभारी गावचा "कारभारी" बनतो. तर गावाविरुध्द, जाती विरुध्द वागणाऱ्या बालटया, बाळा धनगर, आनंदा रामोशी या दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांना शासनही होते मावल्या आई, तिची यात्रा, अंधश्रध्दा, रुढी परंपरा यांना धनगरी जीवनात विशेष महत्त्व आहे.

प्रादेशिक वैशिष्टयात प्रदेशाला महत्त्व दिलेले इथे दिसून आले. कारण प्रदेशाच्या/निसर्गाच्या रागा-लोभावरच इथले जीवन उध्वस्त होते किंवा फुलत जाते. म्हणूनच प्रादेशिक कादंबरीत प्रदेश या घटकाला माडगूळकरांनी महत्त्व दिलेले दिसले. हे करताना पूर्वीची कथानकाची सर्व तंत्रे त्यांनी झुगारुन दिली कथानक उत्कंठावर्धक पारंपारिक ही कल्पना स्वीकारलेली नाही. म्हणजेच कथानकाच्या बाबतीतही "बनगरवाडी" वेगळीच कादंबरी दिसते. इथे प्रेमकहाणी नाही तर समग्र "बनगरवाडी"चे मेंढपाळाचे वास्तव विश्व उभे केले आहे.

पुढल्या तिस-या प्रकरणात कथानक व व्यक्तिचित्रणाचा विचार केलेला आ या कादंबरीतील व्यक्तिचित्रे रेखाटताना येथे प्रादेशिकता व स्वभाव यांचा काही एक आंतरिक संबंध कादंबरीकाराने उमजून घेतलेला जाणवतो. व्यक्तींच्या स्वभा-वातूनच कथानक घडत जाते.

वस्तुतः पारंपारिक कादंबरीत जिला नायकत्व बहाल केले जाते अशी एकही व्यक्ती कादंबरीकाराने चित्रित केलेली नाही. त्यातल्या त्यात मास्तरही व्यक्ति-रेखा मध्यवर्ती कल्पून "बनगरवाडी" चित्रण केले आहे. "बनगरवाडी"तील अन्य-व्यक्तिरेखा कादंबरीकारांने मास्तरांच्या संदर्भात आणि त्याच्या नजरेने चित्रित केलेल्या आहेत आणि बाकीच्या व्यक्तिचित्रणातच मास्तरची व्यक्तिरेखा आपोआप साकार झाल्याची दिसते.

"बनगरवाडी"चे कथानक थोडक्यात पाहताना असे दिसते की, उजाड माळा-वरच्या या मेंढपाळांच्या विश्वात मास्तर येतो. इथल्या "विश्वांशी" समरस होतो गावची कामे करताकरता शाळा व तालीम स्माला आणतो व बनगरवाडीत दुष्काळ पडताच व योगायोगाने बदलीची ऑर्डर मिळताच गाव सोडून निघून जातो.

"बनगरवाडी"चे सामाजिक जीवन पहाता असे दिसते हे मेंढपाळ एकमेकाशी सलोख्याने, रूढीपरंपरा पाळत जगतात. जीवन जगतात आयबू सारख्या परदेशी व्यक्तीस गावगाड्यात सामावून घेतले जाते. या ग्रामीण जीवनाचे वैशिष्ट्य म्हणजे सत्प्रवृत्तीच्या माणसाकडेच गावचे पुढारीपणे जाते. कारभारी हा त्याच्या सत्प्रवृत्ती मुळेच गावचा "कारभारी" बनतो त्याचा सल्ला हा गावाच्या हितासाठीच असतो. कारभाऱ्याच्या रूपाने गावच्या पुढाऱ्याचे प्रतिनिधिक चित्रण माडगूळकरांनी केले आहे.

कारभारी जसा सत्प्रवृत्त, गावाशी समरस होणारा एक नमुना तर मेंढपाळाच्या धंद्याशी समरस झालेल्या काकुबाचा दुसरा नमुना दिसतो. तो आपल्या व्यवसायाशी इतका समरस झाला आहे की, लांडग्याचा वास तो अचूक ओळखतो. राखणीला सावध राहून तो बसूनच झोप घ्यायला शिकला आहे. मेंढरांची पैदासही तो अचूक ओळखतो काकुबा दुसरा प्रतिनिधी गावचा आहे.

ग्रामीण जीवनात समाजाचे ऐकणे भाग पडते, रूढी परंपरा. जातपात याच्या विरूद्ध जाता येत नाही परंतु सत्प्रवृत्तीच्या लोकाबरोबर व दुष्ट प्रवृत्तीची माणसेही बालट्या, बाळा धनगर, आनंदा रामोशी आहेत. त्यांना आपल्या दुर्गुणाचे फळ भोगावेच लागते.

शेकू व नानी या दोन व्यक्तिरेखातून माडगूळकरांनी खेड्यातील कुटुंबाचे चित्र रेखाटले आहे. पुरूष एखादे वेळेस "वाहवत" गेला तर त्याला आपल्या कुटुंबात परत घ्यावे लागते. काही काळ अस्थिर झालेले कौटुंबिक जीवन पुन्हा स्थिर होते याचे चित्रण या कुटुंबाच्या रूपाने माडगूळकरांनी दाखविले आहे.

जाती पातीची श्रेष्ठता ग्रामीण समाज टिकवून धरतो. वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या जाती आपला अहंकार जपत असतात व कनिष्ठ जाती त्यांच्या अहंकारात मान्यता ही देत असतात. हे ग्रामीण जातीव्यवस्थेचे यथातथ्य चित्रण उपकथेच्याद्वारा कादंबरीकाराने रेखाटलेले आहे. या साऱ्या व्यक्तिचित्रणातून मास्तरांची व्यक्तिरेखा आपोआप साकार होते. मास्तर हा गावच्या भल्यासाठी झटणारा, धनगरांची अडेल ती कामे करणारा. वाडीत शाळा व तालीम तयार करुन वाडीला रुपाला आणणारा सर्वांचा नेताच आहे. मास्तरांच्या शब्दाला किंमत आहे. मास्तराबद्दल साऱ्या गावात विश्वास आहे (फक्त बालट्या सोडून) म्हणूनच पैसे बदलून आणण्यास, चोरुन चोळी शिवून आणण्यास सांगताना, किंवा नवराबायकोतील नाजूक प्रश्न स्त्रीया मास्तरापुढे मांडतात. असा हा मास्तर इथली जीवनपध्दती न्याहाळतो. व वाडीसाठी झटत राहतो व बदली होताच निर्विकारपणे गाव सोडून जातो.

ह्या व्यक्ती विशिष्ठ भू-संस्कृती प्रदेशातील आहेत. याचा प्रत्यय "बनगरवाडी" या कादंबरीत येतो. प्रदेश आणि व्यक्ती यांच्यातील जिवंत आंतरिक संबंध माडगूळकरांनी प्रत्ययकारी रीतीने चित्रित केलेले आहेत. पूर्वीच्या कादंबऱ्यातील उदात्त, पराक्रमी नायकाची कल्पनाच माडगूळकरांनी बाजूला सारुन एका सर्व सामान्य व्यक्तीला कादंबरीत केंद्रस्थान देऊन इतर व्यक्तिरेखा त्यांना प्रादेशिकतेशी असलेली अंतरंग संबंध ध्यानात घेऊन चित्रित केल्या आहेत. प्रस्तुत कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचे हे वेगळेपणो होय. यामुळे पारंपारिक मराठी कादंबरीच्या रुपाची कल्पना एकप्रकारे माडगूळकरांनी बदलून टाकली व व्यक्तिचित्रणाला एक वेगळाच दृष्टिकोण देऊन कादंबरीची कक्षा रुंदावली असे म्हणावेसे वाटते.

चौथ्या प्रकरणात "बनगरवाडी" कादंबरीच्या भाषाशैलीचा विचार केलेला आहे.

भाषा शैलीच्या बाबतीत असे दिसून येते की, प्रादेशिक कादंबरी आधीच्या कादंबरीतील भाषाही सहेतुकपणे वापरलेली, ललित वाङ्.मयाची आहे. परंतु माडगूळकरांनी आपल्या भाषेला या कृत्रिम संकेतापासून दूर ठेवली. त्यांनी निवेदनासाठी व वर्णनासाठी नागर भाषेचा प्राधान्याने उपयोग केला खरा. मात्र तो करताना अधून मधून प्रादेशिक भाषेतील शब्द अत्यंत प्रभावीपणे व वाचकांना संदर्भाने सहजच अर्थ कळेल अशा पध्दतीने वापरले. संवादासाठी तर सर्रासपणे ग्रामीण लोकांच्या बोलीचा उपयोग करुन त्यांचे अंतरंग प्रभावीपणे आविष्कृत केले. ललित साहित्य आणि भाषा यांच्यातील अडसर माडगूळकरांनी केला व साक्षात लोकजीवनाला भिडणारी, प्रादेशिकतेची वैशिष्टये असणारी भाषा त्यांनी वापरली व तिचे सामर्थ्य प्रत्ययाला आणून दिले. भाषा वापराबाबत माडगूळकरांची ही कामगिरी विशेषत्वाने "बनगरवाडी"मध्ये प्रत्ययाला येते.

अशा प्रकारे कथानक, व्यक्तिचित्रण, नायक, निवेदन पध्दती माडगूळकरांनं वेगळेपणा "बनगरवाडी" या प्रादेशिक कादंबरीत आणला म्हणूनच "बनगरवाडी" ही ख-या अर्थाने मराठीतील पहिली प्रादेशिक कादंबरी होय.

.....